# जाहिर प्रकटन

नाशिक शहर व परिसरातील तमाम नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रातील मान्यवरांना कळविण्यात येते की, शुभेच्छा, वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, धार्मिक, श्रंध्दाजली व इतर कार्यक्रमांसाठी तात्पुरते स्वरुपात नाशिक महानगरपालिकेत विभागीय कार्यालयांचे क्षेत्रात वेगवेगळया ठिकाणी १० फूट X १० फुट या मोजमापाचे जाहिरात फलक लावणेसाठी जागा निश्चित केलेल्या आहेत. ज्या त्या विभागीय कार्यालयात अर्ज दाखल करुन मनपाने विहित केलेल्या अटीशर्तीनुसार फलक लावावेत. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी फलक लावुन शहर विद्रुपिकरण करु नये असे यापुर्वीही वेळोवेळी जाहिर प्रकटन दिलेले आहे. मात्र सद्या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेंव्यतिरिक्त इतर जागेंवर मोठया प्रमाणात जाहिरात फलके / जाहिराती लागल्याचे आढळून आलेले आहे.

तसेच, खाजगी जागेत महानगरपालिकेची कोणतीही परवानगी / लायसेन्स न घेता जाहिरात फलक / होर्डिग उभारणी केलेले आहे. तसेच, परवानगी / लायसेन्स नुतनीकरण न करता जाहिरात फलकांचा वापर सुरु केलेला आहे. सदरचे अनाधिकृत जाहिराती / जाहिरात फलक दिनांक ०१ जुलै, २०२१ पुर्वी संबंधितांनी स्वत: काढून टाकावेत. या तारखेपुर्वी न काढल्यास, जनहित याचिका क्र. १५५/२०११ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ३१/०१/२०१७ रोजीचे आदेशान्वये तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४४,२४५ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार सर्व अनाधिकृत जाहिराती/जाहिरात फलके निष्कासित करुन जप्त करणेची कारवाई करणेत येईल. महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डिफेंसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ यामधील तरतुदी अन्वये पोलिसात गुन्हा दाखल करणेत येईल. व त्याचे होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी अनाधिकृत जाहिराती उभारणारे,करणारे यांचेवर राहील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आयुक्त, २४/०६/२०२१

नाशिक महानगरपालिका,नाशिक